make food
affordable for
everyone /
إجعل طعام
بأسعار معقولة
لكل أشخاص /
在公园和公交
上的长椅上放
置毛绒座 / put
plush seats
on park and
bus benches
/ idøm folk,
der smider
affald fra sig, en bøde /
לבנות שירותים ציבוריים נקיים /
มีโครงการศิลปินพานักในสวน
สาธารณะทุกแห่ง / werk en

l'étranger à
côté de vous /
woon छतबगीचों द्वारा
in de- बारिश के पानी
zelfde को जमा करना /
gemeen- Avere più
schap / eventi artistici
create more gratuiti per
comfortable tutti / 歩行者用
shelters for の通りと自転
the homeless 車専用道路
population / を、全部道路
tocar música clásica より高く建設
en el metro / فواره های する / plant
بیشتری نصب کنید / fruit-bearing
hupen durch Gesetze un- trees at street
terbinden / level / altyapı
parlez avec sistemlerini

tamamen ye-
niden tasar-
layarak /
ṣẹ̀dá bọ́sì tí
àwọn èrò ọkọ̀
ṣatọ́kùn rẹ̀ /
रस्त्याच्या काठे
ला फळझाडे
लावणे / create
buses that
are powered
by the pas-
senger /
ustawmy
wokół miasta
więcej kosz-
ów na re-
cyklizację /

criar arte pú-
blica em áreas
negligenciadas /
给无家可归的人提
供更多的庇护
所 / расши-
рить пеше-
ходные зоны /
dùng kỹ thuật
để tạo ra các
dạng thức mới về
sự cam kết
của công dân
/ build under-
ground instead of
above ground /
뜻밖의 장소에 작은
쉼터를 만들자

**BMW GUGGENHEIM LAB**

**News Release**

**Advisory Committee**
Daniel Barenboim
Elizabeth Diller
Nicholas Humphrey
Muchadeyi Ashton Masunda
Enrique Peñalosa
Juliet Schor
Rirkrit Tiravanija
Geetam Tiwari
Wang Shi

# ‘पार्टिसिपेटरी सिटी: बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबमधील १०० नागरी कल’ हे प्रदर्शन आक्टोबरमध्ये न्यूयॉर्कमधील गुगेनहाईम म्युझियममध्ये सुरु होत आहे

**प्रदर्शनात बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबमधून समोर आलेले प्रमुख विषय व कल्पना मांडल्या जातील**

**प्रदर्शन: पार्टिसिपेटरी सिटी: बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबमधील १०० नागरी कल**
**स्थळ: सॉलोमन आर. गुगेनहाईम म्युझियम, १०७१ फिफ्थ अॅव्हेन्यू, न्यूयॉर्क**
**स्थळ: अॅनेक्स लेवल २**
**तारखा: ११ ऑक्टोबर २०१३ - ५ जानेवारी २०१४**
**पत्रकारांसाठी प्रिव्ह्यू: गुरुवार १० ऑक्टोबर २०१३**

**(न्यूयॉर्क, एनवाय - २ जुलै २०१३) -** २०११ ते २०१३ या कालावधीत नागरी जीवनातील मुद्यांवर वैचारिक मंथन करणाऱ्या बीएमडब्ल्यू लॅबने नागरी रचना आणि शहरांविषयींच्या नवीन विचारांना स्फूर्ती देण्यासाठी न्यू यॉर्क, बर्लिन आणि मुंबई असा प्रवास केला. या दोन वर्षांच्या जागतिक प्रवासादरम्यान नजरेस आलेले प्रमुख विषय आणि कल्पना सारांशरुपाने मांडण्यासाठी गुगेनहाईम म्युझियम ‘पार्टिसिपेटरी सिटी: बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबमधील १०० नागरी कल’ हे प्रदर्शन ११ ऑक्टोबर २०१३ ते ५ जानेवारी २०१४ या कालावधीसाठी सादर करत आहे.

सॉलोमन आर. गुगेनहाईम म्युझियम अॅण्ड फौंडेशनचे संचालक रिचर्ड आर्मस्ट्राँग म्हणाले, ‘‘बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबच्या असामान्य साध्यतांविषयी आणि त्यातून प्रेरित झालेल्या अनेकविध कल्पना आणि संभाषणांविषयी गुगेनहाईमला अभिमान वाटतो. बीएमडब्ल्यू समूहाचे आभार आहेत की ज्यांचे समर्थन आणि सहाय्य लाभल्यामुळे आम्हाला या लॅबच्या माध्यमातून चार भिंतींच्या बाहेर दूरवर शहरांच्या केंद्रस्थानी जाऊन नागरी जीवनाविषयी एक व्यापक व निरंतर संवाद सुरु करता

**Solomon R. Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

आला. प्रत्यक्ष स्थळावर आणि ऑनलाईन प्रकाराने शेकडो, हजारो उत्साही लोकांनी यात सहभाग घेतला आणि संयुक्त संघराज्याने याला एक आदर्श प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे. न्यू यॉर्क येथे गुगेनहाईममधील या प्रदर्शनासह आम्ही जगभरातून योगदान देणाऱ्यांच्या अंत:दृष्टीतून लॅबमध्ये जे काही जाणले गेले ते जाहीर करत आहोत.''

१०० नागरी कल: बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबमधील कल्पना कोशाच्या (100 Urban Trends: A Glossary of Ideas from the BMW Guggenheim Lab) न्यू यॉर्क, बर्लिन आणि मुंबई आवृत्त्यांमध्ये प्रकाशित झालेल्या १०० मुख्य कल्पनांचा '*पार्टिसिपेटरी सिटी*' मध्ये समावेश आहे. यातील प्रत्येक कल्पना स्थाप्त्य रचनाकार, शिक्षणतज्ज्ञ, रचनानिर्माते आणि कलाकार यांच्या जागतिक समुच्चयाद्वारे तसेच लॅबच्या कार्यक्रम व प्रकल्पांद्वारे विशद केली गेली आहे. या प्रदर्शनात हे कल आराखडे, चित्रे, लघु व्हिडियो आणि कलात्मक प्रतिमांद्वारे पूर्णपणे डिजिटल प्रकारे दाखवले जातील.

बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबच्या क्युरेटर आणि असोशिएट क्युरेटर, आर्किटेक्चर असलेल्या मारिया निकॅनॉर म्हणाल्या, ''न्यूयॉर्क, बर्लिन आणि मुंबई येथे ज्या कल्पना उदयास आल्या त्यांच्या आधारावर शहरे आणि त्यातील सार्वजनिक जागांचा वापर याबाबत नावीन्यपूर्ण ध्येयदृष्टीकोन हे प्रदर्शन सादर करते. उदयोन्मुख आणि स्थापित बुद्धिवंत अशा दोघांकडूनही जगात सर्वत्र नागरी वातावरणाचा नव्याने विचार होत आहे आणि त्याला नवीन वळण दिले जात आहे व त्यातील नवीन परिप्रेक्ष्ये ठळकपणे मांडताना आम्हाला आनंद होत आहे. या सादरीकरणासाठी लॅब न्यू यॉर्कमध्ये परत जात असतानाच शहरे आता कशी आहेत आणि ती कशी असू शकतील यावरचा सार्वजनिक संवाद आम्ही आणखी पुढे घेऊन जाऊ शकू अशी आम्हाला आशा आहे.''

पार्टिसिपेटरी सिटी  मध्ये लॅबचे स्थापत्यरचनाकार, ग्राफिक डिझायनर आणि लॅबच्या संघाचे सदस्य यांची, तसेच या तीनही खंडांमध्ये लॅबला जीवंत करणाऱ्या काही निवडक योगदात्यांचीही माहिती सादर केली जाईल.

प्रदर्शनाच्या जोडीला स्थापत्यरचना, नागरीपणा आणि शहरे व त्यातील सार्वजनिक जागा यांच्याशी लोकांचे नातेसंबंध यावर वेगवेगळे सार्वजनिक कार्यक्रम सादर केले जातील.

न्यू यॉर्क, बर्लिन आणि मुंबईतील निवडक कलांवर लक्ष केंद्रित करणारी व त्याविषयी विस्ताराने उहापोह करणारी लेखमालिका सध्या लॅब । लॉग (Lab | Log) या बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबच्या ब्लॉगवर उपलब्ध आहे.

या प्रदर्शनाच्या समाप्तीबरोबर बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबच्या जागतिक कार्यक्रमाचा समारोप होईल.

**बीएमडब्ल्यू गुगेनहाईम प्रयोगशाळेविषयी**

सॉलोमन आर. गुगेनहाईम फौंडेशन आणि बीएमडब्ल्यू समूहाचा सहउपक्रम असलेली बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅब ''आरामदायित्वाचा सामना'' हा विषय घेऊन प्रथम न्यूयॉर्क येथे (३ ऑगस्ट - १६

**Solomon R.
Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

ऑक्टोबर २०११) खुली झाली; तेथून शहरे घडवण्यातील नागरिकांच्या सहभागावर भर देणारा ''घडवणे'' हा विषय घेऊन बर्लिन (१५ जून - २९ जुलै २०१२) येथे गेली; आणि शेवटी मुंबईतील अनेक शहरांमध्ये (९ डिसेंबर २०१२ - २० जानेवारी २०१३) ठेवण्यात आली, जेथील प्रकल्प आणि कार्यक्रमांनी ''खाजगीपणा'' आणि तद्निगडित सार्वजनिक जीवनाचे मुद्दे हाताळले. प्रयोगशाळेच्या प्रत्यक्ष स्थळावरील आणि ऑनलाईन प्रकारच्या ५०० हून अधिक सार्वजनिक कार्यक्रम, कार्यशाळा, व्याख्याने आणि संशोधन व नागरी प्रकल्प यामध्ये जगभरातील १६० हून अधिक देश - प्रदेशांतून लोक सहभागी झाले. सॉलोमन आर. गुगेनहाईम म्युझियमच्या क्युरेटर मारिया निकॅनॉर बीएमडब्ल्यू गुगेनहाईम लॅबची व्यवस्था पाहात आहेत.

प्रकल्पाच्या Lab | Log ब्लॉगवर बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबला योगदान दिलेल्या व्यक्तींच्या मुलाखती बघता येतील तसेच लॅबमधील उपक्रमांविषयी जाणून घेता येईल. जनतेने bmwguggenheimlab.org वर भेट द्यावी, जेथे त्यांना लॅब ऑनलाईन डॉक्युमेंटच्या निर्मितीमध्ये मदत करेल. बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबच्या ट्विटरवरील (@BMWGuggLab आणि #BGLab) Facebook, YouTube, Flickr, वरील समर्पित सोशल कम्युनिटीजना सामील होण्यासाठी आणि प्रकल्पा संबंधित अद्ययावत माहितीकरिता लॅबच्या ई-न्यूजलेटरला subscribe करण्यासाठी जनतेला आवाहन करण्यात आले आहे.

## सोलोमन आर गुगेनहाईम फाऊंडेशन बाबत

१९३७ साली स्थापना झालेल्या सोलोमन आर. गुगेनहाईम फाऊंडेशनचे काम कला, विशेषत: आधुनिक आणि समकालीन काळ, हे सर्व प्रदर्शने, शैक्षणिक कार्यक्रम, संशोधन उपक्रम आणि प्रकाशने यांच्या माध्यमातून यांचा विचार करण्याचे आहे. १९७० साली सुरु झालेल्या न्यूयॉर्कमधील सोलोमन आर गुगेनहाईम म्युझियमच्या साखळीत पेगी गुगेनहाईम कलेक्शन व्हेनिस याचा विस्तार होऊन गुगेनहाइम म्युझियम बिलबाव १९९७ साली सुरु झालेले आणि गुगेनहाईम अबुधाबीचे सध्या काम सुरु आहे. भविष्याचा विचार करत असताना गुगेनहाईम फाऊंडेशनने आंतरराष्ट्रीय करार केले असून त्यातून समकालीन कला, वास्तुरचना आणि डिझाइन या गोष्टी म्युझियमच्या भिंतींबाहेर नेण्याचा प्रयत्न केला आहे. फाऊंडेशनबाबतची अधिक माहिती येथे सापडू शकेल guggenheim.org.

## भेट देणाऱ्यांसाठी माहिती

प्रवेश: प्रौढ २२ डॉलर, विद्यार्थी/वरिष्ठ नागरिक (६५+) १८ डॉलर, सभासद व १२ वर्षांखालील मुलांना मोफत प्रवेश. प्रवेश करताना किंवा वैयक्तिक उपकरणावर डाऊनलोड करुन गुगेनहाईमचे मोफत नवीन ॲप (app) उपलब्ध जे लॅब पाहण्याचा आनंद द्वीगुणित करते. या ॲपमध्ये खास प्रदर्शनांविषयीची माहिती, गुगेनहाईमच्या कायम कलेक्शनमधील १२०० हून अधिक वस्तूंची उपलब्धता, आणि म्युझियमच्या प्रसिद्ध इमारतीविषयीची माहिती या गोष्टी आहेत. आंधळे किंवा दृष्टीने अधू असलेल्या भेटकर्त्यांसाठी निवडक प्रदर्शन वस्तूंविषयी वाचिक प्रतिमा मार्गदर्शकांचासुद्धा समावेश केला गेला आहे.

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

म्युझियमचे तास: रवि - बुध, सकाळी १० ते संध्याकाळी ५.४५; शुक्र, सकाळी १० ते संध्याकाळी ५.४५; शनि, सकाळी १० ते रात्री ७.४५; गुरुवारी बंद. दर शनिवारी संध्याकाळी ५.४५ वा. पासून म्युझियममध्ये 'पे व्हॉट यू विश' हा कार्यक्रम होतो. सर्वसाधारण माहितीसाठी 212 423 3500 या क्रमांकावर कॉल करा किंवा म्युझियमला येथे ऑनलाईन भेट द्या:

guggenheim.org
twitter.com/guggenheim
facebook.com/guggenheimmuseum
youtube.com/guggenheim
flickr.com/guggenheim_museum
instagram.com/guggenheim

पब्लिसिटी चित्रांसाठी पहा guggenheim.org/pressimages
यूजर आयडी: photoservice
पासवर्ड: presspass

२ जुलै २०१३
#1305/BGL30

**अधिक माहितीसाठी संपर्क साधा:**

लॉरिन व्हॅन नॅट्टेन, असोसिएट डायरेक्टर, मीडिया व पब्लिक रिलेशन्स
सोलोमन आर. गुगेनहाईम म्युझियम
212 423 3840
pressoffice@guggenheim.org

**बीएमडब्ल्यूशी संबंधित चौकशीकरिता:**

ॲल्मट स्टोलबर्ग, प्रवक्ता कल्चरल एन्गेजमेण्ट
बीएमडब्ल्यू ग्रुप कॉर्पोरेट अँड गव्हर्नमेण्टल अफेयर्स
+49 89 382 38770 / almut.stollberg@bmw.de